दैनिक

MAHILA SANVAD

# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 290, Marathi Daily Saturday, Date - 30 May 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २९० वा | मराठी दैनिक | शनिवार दि. ३० मे २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४



**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

**महिला संवाद**

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111



**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा


# मिथेनॉलच्या भेसळीने घेतले १३ बळी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराला हादरवून सोडणाऱ्या विषारी दारूकांडातील मृत्यूंची संख्या वाढत असून आतापर्यंत १३ जणांचा बळी गेला आहे. या घटनेमुळे आनंदवन, काटेवस्ती, संजयनगर, आझाद चौक आणि जय महाराष्ट्र चौक परिसरात शोककळा पसरली असून अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. स्थानिक नागरिकांच्या मते मृतांचा आकडा अधिक असण्याची शक्यता असून प्रशासनाकडून याबाबत तपास सुरू आहे. प्राथमिक तपासात उरळी कांचन परिसरातून या विषारी दारूचे जाळे कार्यरत असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उरळी कांचन येथील राधेश्याम प्रजापती हा बेकायदेशीर दारू तयार करण्याचे काम करत होता. त्याच्याकडून योगेश वानखेडे हा मोठ्या प्रमाणात दारू खरेदी करून पुणे व पिंपरी-चिंचवडमधील विविध अवैध दारू विक्रेत्यांना पुरवठा करत होता.

अधिक नफा कमावण्याच्या उद्देशाने योगेश वानखेडे याने दारूमध्ये मिथेनॉल या घातक रसायनाची भेसळ केली. त्यामुळे दारूचे प्रमाण वाढले; मात्र मिथेनॉलचे प्रमाण अत्याधिक झाल्याने ती दारू विषारी बनली. याच विषारी दारूमुळे अनेक नागरिकांचा मृत्यू झाल्याचे तपासात उघड झाले आहे. तपासात पुढे असेही निष्पन्न झाले की, वानखेडे याने ही दारू पिंपरी-चिंचवडमधील फुगेवाडी परिसरातील दारू विक्रेते कर्नलसिंह विरखा आणि गुरमितसिंह विरखा या बापलेकांना विकली होती. याशिवाय पुण्यातील खडकी भागातील कल्पेश अग्रवाल, वडारवाडीतील अरिहंत धोत्रे, तसेच हडपसर व काळेपडळ परिसरातील आकाश जाधव आणि अशोक हांडे यांनाही या दारूचा पुरवठा करण्यात आला होता. या दारूच्या सेवनामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये आठ तर पुणे शहरात पाच अशा एकूण १३ मृत्यूंची अधिकृत नोंद झाली आहे. मात्र अनेक जण उपचार घेत असल्याने मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. या प्रकरणात



पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सहा तर पुणे पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असून एकूण आठ आरोपी सध्या पोलिसांच्या ताब्यात आहेत. दरम्यान, या घटनेमुळे उरळी कांचन (पुणे ग्रामीण), पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड या तिन्ही पोलीस यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात अवैध दारूचे उत्पादन व वितरण सुरू असताना संबंधित यंत्रणांना त्याची माहिती कशी मिळाली नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, या प्रकरणाबाबत माझे पुणे पोलीस आयुक्तांशी बोलणे झाले आहे. विषारी दारू तयार झालेल्या ठिकाणाचा शोध पोलिसांनी लावला आहे. या प्रकरणातील प्रमुख आरोपींना अटक करण्यात आली असून आणखी काही जणांचा सहभाग असण्याची शक्यता आहे. संपूर्ण साखळीचा शोध घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल. ही घटना अत्यंत गंभीर असून हा प्रकार म्हणजे एक प्रकारची हत्या आहे. या दारूकांडातील मृत्यूंची मालिका अद्याप सुरूच आहे. अकबर अजीम खान पठाण यांना तोंडातून फेस येत असल्याने बुधवारी रात्री वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र गुरुवारी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. ते गेली १५ वर्षे मद्यपान करत असल्याचे नातेवाइकांनी सांगितले.

तसेच राजेश राजपूत हे गुरुवारी सकाळी अचानक बेशुद्ध पडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली असा परिवार आहे. ते बँक रिकव्हरीचे काम करत होते.

## शासकीय वसतिगृहाकरिता इमारत भाडेतत्त्वावर देण्याचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय विभागामार्फत जुन्नर तालुक्यात अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी १०० विद्यार्थ्यांची क्षमता असलेले शासकीय वसतिगृह सुरू करण्यात येणार असून नारायणगाव व आळेफाटा परिसरात आवश्यक सुविधा असलेली इमारत भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शासकीय अटी व शर्तींनुसार भाडे तत्त्वावर इमारत घेण्यात येणार असून, इमारतीमध्ये किमान २५ ते ३० खोल्या अथवा मोठी इमारत असणे आवश्यक आहे.

तसेच स्वतंत्र पुरुष स्त्री  विभाग, पुरेसे शौचालय व स्नानगृह, पिण्याचे पाणी व २४ तास पाणीपुरवठा, स्वतंत्र मेस व स्वयंपाक सुविधा, सुरक्षितता व वाहनतळ व्यवस्था असणे अपेक्षित आहे. बसस्थानक किंवा महाविद्यालय परिसरालगत असलेल्या इमारतींना प्राधान्य देण्यात येणार आहे.

दीर्घकालीन भाडे करारासाठी इच्छुकांनी अधीक्षक, मुलांचे शासकीय वसतिगृह, चांडोली (ता. खेड, जि. पुणे) यांच्याशी कार्यालयीन वेळेत ९३२५०५४३५८ ई-मेल : लहरपवेश्रळर्लीूहेींशश्रसारळश्र यावर संपर्क साधावा, अशी माहिती गृहपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह, चांडोली, खेड यांनी कळविले आहे.

## लॉजवर प्रेमीयुगुलाचा आत्महत्येचा प्रयत्न, तरुणाचा मृत्यू

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगावमधून एक धक्कादायक आणि हृदयद्रावक बातमी समोर येत आहे. दोघा प्रेमी युगुलांनी आयुष्य संपवण्याचा निर्णय घेतला. दोघेही लॉजवर गेले. दोघांनी गळ्याला फंदा लावला. पण फास तुटल्याने मुलगी वाचली. पण मुलगा वाचू शकला नाही. त्याला रुग्णालयात नेलं असता त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे जळगावात हळहळ व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून अधिक तपास सुरू आहे. या तरुणांनी टोकाचं पाऊल उचलण्याचा निर्णय का घेतला? याचाही तपास घेतला जात आहे.

पाचोऱ्याच्या गोराडखेडे रोडवरील एका लॉजमध्ये ही घटना घडली आहे. रवींद्र संजय मोरे असं या २५ वर्षीय तरुणाचं नाव आहे. रवींद्रच्या कुटुंबीयांनी हा सर्व प्रकार संशयास्पद असल्याचं म्हटलं आहे. या प्रकरणाची कसूनच चौकशी करण्याची मागणी त्याच्या कुटुंबीयांनी केली आहे. या घटनेप्रकरणी पाचोरा पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद झाली आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

रवींद्र मोरेचा विवाह महिन्याभरापूर्वीच ठरला होता. त्याचं लग्न काही दिवसावर आलं होतं. पण त्याचं प्रेम दुसऱ्या मुलीवर होतं. त्यामुळे तो तणावात होता. रवींद्र हा भडगाव तालुक्यातील गिरडचा राहणारा आहे. रवींद्र आणि त्याची अल्पवयीन प्रेयसी हे गुरुवारी सकाळी १० वाजता गोराडखेडे रोडवरच्या लॉजवर आले होते. खोलीत गेल्यावर दोघांनीही आयुष्य संपवण्याचा निर्णय घेतला. त्यांनी पंख्याला फास लावून जीव देण्याचा प्रयत्न केला. त्यात रवींद्रचा मृत्यू झाला. तर फास तुटल्याने सुदैवाने अल्पवयीन मुलगी वाचली.

या सर्व प्रकाराने घाबरलेल्या मुलीने लगेचच लॉजमधल्या कर्मचाऱ्यांना माहिती दिली. कर्मचाऱ्यांनी तात्काळ रवींद्रला रुग्णालयात नेलं. पण तिथे पोहोचल्यावर त्याला मृत घोषित करण्यात आलं. अचानक घडलेल्या या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. रवींद्रचे कुटुंबीय तात्काळ घटनास्थळी आले. त्यांनी या सर्व प्रकारावर संशय व्यक्त केला आहे. हा घातपात असल्याचं त्यांचं म्हणणं आहे. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, या सर्व प्रकाराने मुलगी प्रचंड घाबरलेली असून तिने अद्याप काहीच प्रतिक्रिया दिलेली नाही. या मुलीच्या प्रतिक्रियेनंतरच प्रकरणाची दुसरी बाजू समोर येणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

## जनगणना करणाऱ्या महिला कर्मचाऱ्याला मारहाण; पुण्यात खळबळ

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. पुण्यात जनगणना करणाऱ्या महिला कर्मचाऱ्याला मारहाण करण्यात आली आहे. जनगणना करायला गेलेल्या महिला कर्मचाऱ्याला ५ ते १० जणांकडून आधी शिवीगाळ आणि मग मारहाण  करण्यात आल्याचा प्रकार घडला आहे. पुण्यातील महर्षीनगरमध्ये ही धक्कादायक घटना घडली आहे. दरम्यान या प्रकरणी स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे महापालिकेत काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनी या प्रकरणी पोलीसात तक्रार दिली असून स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलीस या प्रकरणाची पुढील चौकशी करत आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही सगळी घटना २७ मे रोजी दुपारी तीन ते साडेचार दरम्यान मीनाताई ठाकरे वसाहत या ठिकाणी घडली. यातील तक्रारदार या पुणे महानगरपालिकेच्या कर्मचारी असून सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामासाठी कार्यरत आहेत. २७ मे रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास फिर्यादी या मीनाताई ठाकरे वसाहत या ठिकाणी जनगणनेच काम करत असताना आरोपी विकास मोरे यांची पत्नी क्रांती मोरे, बहिण मुक्ता कसबे, पुतण्या अभिजीत मोरे, या सर्वांनी मिळून त्यांना काम करत असताना अडथळा निर्माण केला आणि त्यांना शिवीगाळ करायला सुरुवात केली.

महिला कर्मचारी पुन्हा एकदा त्या भागात जनगणनेचे काम करण्यास गेले असता त्यांनी काल झालेल्या प्रकरणानंतर संबंधित कुटुंबाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, काल झालेल्या भांडणाच्या रागातून मोरे कुटुंबीयांनी कर्मचारी महिलेला त्यांच्या पाठीमागून येऊन दगडाने मारहाण करून लाथा बुक्क्या देखील मारल्या, अशी तक्रार त्यांनी पोलिसात दिली आहे. यावरून विकास मोरे, क्रांती मोरे, मुक्ता कसबे, लीलावती मोरे, अभिजीत मोरे व इतर अनोळखी पाच महिला व पुरुष यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कारवाई सुरू आहे.

## तरुण व्यापाऱ्याचा लॉजिंगमध्ये मृतदेह

**पाचोरा । प्रतिनिधी**



शहरातील जळगाव रोडवर असलेल्या एका लॉजिंगमध्ये एका २५ वर्षीय तरुणाचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह  आढळून आल्याने संपूर्ण परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. रवींद्र संजय मोरे (वय २५) असे या तरुणाचे नाव असून, तो पाचोरा शहरातच रेडिमेड कपड्यांचे दुकान  चालवत होता. एका तरुण आणि उमद्या व्यापाऱ्याने अशा प्रकारे आपले आयुष्य संपवल्याने व्यापारी वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

लॉजिंगमध्ये रवींद्रने गळफास घेतल्याची बाब समोर येताच, त्याला तातडीने खाली उतरवून उपचारासाठी प्रथम एका खाजगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्याला तातडीने पाचोरा ग्रामीण रुग्णालयात  दाखल करण्यात आले. तिथे तपासणी अंती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित  केले.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच रवींद्रच्या नातेवाइकांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली. दरम्यान, रवींद्र हा टोकाचे पाऊल उचलू शकत नाही, त्याचा घातपात झाला असावा, असा संशय नातेवाइकांनी व्यक्त केला आहे. या घटनेमुळे संतप्त झालेल्या नातेवाइकांनी आणि स्थानिक नागरिकांनी रात्री उशिरापर्यंत ग्रामीण रुग्णालय आणि पाचोरा पोलीस ठाण्याबाहेर मोठी गर्दी केली होती. परिस्थिती आणखी ताणली गेली जेव्हा संतप्त नातेवाइकांनी थेट रवींद्रचा मृतदेह पोलीस ठाण्यात आणला आणि या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी लावून धरली.

या घटनेतील अत्यंत वेदनादायी बाब म्हणजे, मृत रवींद्र मोरे याचा अवघ्या महिनाभरापूर्वीच अत्यंत थाटामाटात साखरपुडा झाला होता. घरात लग्नाची लगबग आणि आनंदाचे वातावरण सुरू असतानाच रवींद्रने अचानक हे टोकाचे पाऊल का उचलले? की खरोखरच यामागे काही वेगळे कारण आहे? याबाबत पाचोरा शहरात चर्चा रंगल्या आहेत. या प्रकरणी पाचोरा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## राखाडीच्या जेवणातून विषबाधा; शहापूरमध्ये २२ जण रुग्णालयात दाखल

**शहापूर । प्रतिनिधी**

मुंबईत कलिंगड खाऊन एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे एकच खळबळ उडाली होती. राज्यात विषारी अन्न खाल्ल्याने विषबाधा होण्याचे प्रकार घडत आहेत. कडाक्याचं ऊन असल्याने अन्न लवकर खराब होतं. त्यामुळे विषबाधा होत असल्याचं समोर आलं आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना शिळं अन्न न खाण्याचं आवाहन करण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूरमध्ये एक धक्कादायक प्रकार घडला आहे. राखाडीचं जेवण खाल्ल्याने विषबाधा झाल्याने २२ लोकांना रुग्णालयात दाखल करावं लागलं आहे. या २२ जणांवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

शहापुर तालुक्यातील किन्हवली जवळील शिळ गावामध्ये २२ जणांना अन्नातुन विषबाधा झाल्याची घटना घडली आहे. शिळ गावामध्ये तीन दिवसांपूर्वी मयत झालेल्या व्यक्तीचा राखाडी कार्यक्रम होता. त्या निमित्ताने जेवण ठेवण्यात आलं होतं. दुपारी हे जेवण बनवलं होतं. राखाडीच्या या कार्यक्रमाला बरेच पाहुणे आणि जवळचे लोक आले होते. या सर्वांना दुपारी हे जेवण देण्यात आलं होतं. जे लोक दुपारी जेवून गेले. त्यांना काहीच झाले नाही. त्यांची तब्येत ठणठणीत आहे.

बरीच पाहुणे मंडळी जेवून गेल्यावरही मोठ्या प्रमाणावर जेवण उरलं होतं. त्यामुळे उरलेलं अन्न उन्हामुळे खराब होऊ नये म्हणून थंड पाण्याच्या बादलीत ठेवण्यात आलं होतं. तसेच हे जेवण वाया जाऊ नये म्हणून संध्याकाळी जवळचे नातेवाईक, भावकीतील लोक आणि शेजाऱ्या पाजाऱ्यांना बोलावून त्यांना हे जेवण खाऊ घालण्यात आलं. जेवताना अन्न खराब झाल्याची तक्रार कुणीच केली नाही. त्यामुळे अन्न खराब झाल्याचा कुणाला साधा संशयही आला नव्हता.




जेवण होईपर्यंत कुणाला काहीच झालं नाही. जेवणानंतर थोडावेळ बसल्यावर अचानक कुणाला उलट्या तर कुणाला मळमळ व्हायला लागली. काहींना ताप आला तर काहींना जुलाब लागली. त्यामुळे एकच घबराट पसरली. एकूण २२ जणांना हे अन्न बाधलं. त्यामुळे या सर्वांना तातडीने शहापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात रुग्णांची संख्या अधिक असल्याने काही रुग्णांना जमिनीवरच झोपवून त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले. आता या सर्वांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचं सांगण्यात आलं आहे. जीवावरचं संकट दूर झाल्याने अनेकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे.

दरम्यान, शहापूर उपजिल्हा रुग्णालया तीन महिन्यापासून बंद असल्याने येथील रुग्णांची मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. महिला किंवा पुरुष वार्डामध्ये स्वच्छतागृह गेले तीन महिन्यापासून बंद आहेत. त्यामुळे येथे रुग्णांची मोठी वणवण होत आहे.

## थोडक्यात...

### राजेगाव ग्रामपंचायतीची विकासाची झेप

**घनसावंगी । प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील राजेगाव ग्रामपंचायतीने विकासकामे, लोकसहभाग आणि पारदर्शक प्रशासनाच्या बळावर मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात तालुकास्तरीय प्रथम क्रमांक पटकावून तालुक्याचे नाव उज्वल केले आहे. ग्रामविकास, स्वच्छता, डिजिटल सुविधा, पायाभूत विकास, शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धन या सर्व क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीमुळे राजेगावची निवड या प्रतिष्ठेच्या अभियानासाठी झाली आहे. ग्रामपंचायतीने गावाच्या सर्वांगीण विकासासाठी भव्य व सुसज्ज ग्रामपंचायत इमारत, हायटेक कार्यालय, आधुनिक सभागृह तसेच नागरिकांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. संपूर्ण गावात सौरऊर्जेवरील एलईडी दिवे बसविण्यात आले असून प्रमुख चौक व सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यात आली आहे.

शिक्षण क्षेत्रात अंगणवाडी केंद्रांचे सुशोभीकरण, विद्यार्थ्यांसाठी डिजिटल शिक्षण सुविधा आणि शाळांचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. तसेच धार्मिक व सामाजिक वारसा जपत विविध सभागृहांची उभारणी आणि छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी नवीन बोरवेल, पाणीटाकी व घरोघरी नळ योजना राबविण्यात आली असून आरोग्य उपकेंद्राचे कामही प्रगतीपथावर आहे. गावातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण, भूमिगत गटारे, सार्वजनिक शौचालये आणि स्वच्छता अभियानामुळे गावाचा चेहरामोहरा बदलला आहे. डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देत घरपट्टी आणि पाणी बिल भरण्यासाठी क्यूआर कोड सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच शेतकरी हितासाठी जलसंधारण, शेततळे, विहिरी आणि रोजगारनिर्मितीच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियानांतर्गत नंदुरबार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्या नेतृत्वाखालील उच्चस्तरीय पथकाने २८ मे रोजी राजेगाव ग्रामपंचायतीला भेट देऊन जिल्हास्तरीय मूल्यमापन केले. यावेळी डिजिटलायझेशन, पायाभूत सुविधा, स्वच्छता, शिक्षण, मनरेगा, जलसंधारण आणि आर्थिक स्वावलंबन यासह विविध निकषांची पाहणी करण्यात आली.

ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी, महिला बचत गट, युवक मंडळे आणि ग्रामस्थांच्या एकजुटीमुळे हे यश मिळाल्याची भावना ग्रामपंचायतीतर्फे व्यक्त करण्यात आली असून भविष्यातही स्वच्छ गाव, सुंदर गाव, विकसित गाव हे ध्येय ठेवून विकासाची वाटचाल अधिक वेगाने सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## संपादकीय...

# विषारी दारूचे बळी

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारूमुळे झालेल्या मृत्यूंनी संपूर्ण राज्य हादरले आहे. आतापर्यंत १३ जणांचा बळी गेला असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेने अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. काहींनी कुटुंबप्रमुख गमावला, तर काही मुलांनी आपल्या वडिलांचे छत्र हरपले. ही केवळ एक गुन्हेगारी घटना नाही, तर समाज, प्रशासन आणि कायदा-सुव्यवस्थेच्या यंत्रणांसमोरील गंभीर प्रश्न आहे. प्राथमिक तपासात समोर आलेली माहिती अधिक धक्कादायक आहे. अधिक नफा कमावण्याच्या हव्यासापोटी दारूमध्ये मिथेनॉलसारखे घातक रसायन मिसळण्यात आले. हे रसायन मानवी शरीरासाठी अत्यंत घातक असून अंधत्व, अवयव निकामी होणे आणि मृत्यू यास कारणीभूत ठरते. तरीही पैशाच्या लालसेपोटी काही लोकांनी अनेकांच्या जीवाशी खेळण्याचे धाडस केले. हा प्रकार केवळ निष्काळजीपणा नसून जाणीवपूर्वक केलेला गुन्हा आहे. या प्रकरणात आठ आरोपींना अटक झाली असली तरी केवळ आरोपींना अटक करून जबाबदारी संपत नाही. बेकायदेशीर दारूचे उत्पादन, वाहतूक आणि विक्री हे काम दिवस-दोन दिवसांत उभे राहत नाही. त्यामागे एक संपूर्ण साखळी असते. अनेक ठिकाणी खुलेआम अवैध दारू विकली जात असताना स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि संबंधित विभागांना त्याची माहिती नव्हती, असे मानणे कठीण आहे. त्यामुळे या घटनेत व्यवस्थेचे अपयश स्पष्टपणे दिसून येते. उरळी कांचनपासून पुणे आणि पिंपरी-चिंचवडपर्यंत विषारी दारूचे जाळे पसरले होते. अशा प्रकारचे जाळे उभे राहण्यासाठी आर्थिक हितसंबंध, स्थानिक पातळीवरील संरक्षण आणि प्रशासनाची दुर्लक्ष वृत्ती कारणीभूत ठरत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. त्यामुळे या प्रकरणात केवळ थेट आरोपी नव्हे, तर त्यांना मदत करणारे, संरक्षण देणारे आणि दुर्लक्ष करणाऱ्यांवरही कारवाई होणे आवश्यक आहे. या घटनेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे व्यसनाधीनतेचा प्रश्न. समाजातील अनेक घटक अजूनही स्वस्त आणि बेकायदेशीर दारूकडे वळतात. अशा ठिकाणी आरोग्याचा धोका किती मोठा असू शकतो, याची जाणीव अनेकांना नसते. त्यामुळे केवळ पोलिसी कारवाई पुरेशी नाही, तर जनजागृती, व्यसनमुक्ती आणि सामाजिक हस्तक्षेप यांचीही आवश्यकता आहे.

राज्य सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून संपूर्ण साखळी शोधून कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

# महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचे नेतृत्व करेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र एआय क्रांतीचे नेतृत्व करण्यासाठी अत्यंत सक्षम स्थितीत आहे. मुंबईची आर्थिक ताकद, तंत्रज्ञान कौशल्य, मजबूत स्टार्टअप परिसंस्था आणि नवतंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी यामुळे आगामी काळात महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

मुंबईतील बीकेसी येथे 'मुंबई टेक वीक २०२६' चे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी घेण्यात आलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्र्यांनी दिलखुलास उत्तरे दिले. या कार्यक्रमाला मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुंबई मनपा आयुक्त अश्विनी भिडे, महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, तसेच प्रशासकीय अधिकारी, उद्योजक, स्टार्टअप संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



महाराष्ट्र शासनाने १० हजार कोटी रुपयांची एआय गुंतवणूक, दीड लाख रोजगार निर्मिती, सहा 'सेंटर ऑफ एक्सलन्स' आणि विशेष 'एआय इनोव्हेशन क्षेत्रे' उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एआय क्षेत्रातील संशोधन आणि नवकल्पनांना चालना देण्यासाठी राज्य सरकार 'कम्प्युट-ॲज-अ-सर्व्हिस' सुविधा निर्माण करत आहे. त्याद्वारे नवउद्योजक आणि संशोधकांना २ हजार जीपीयू उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. उच्च क्षमतेच्या कम्प्युटिंग सुविधा परवडत नसल्यास नवकल्पना थांबते. त्यामुळे महाराष्ट्र शासन थेट पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत आहे.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, सरकार फक्त धोरणात्मक चौकट तयार करू शकते; पण खरी स्टार्टअप परिसंस्था संस्थापक आणि उद्योजक घडवतात. डिसेंबर २०२२ मध्ये टेक उद्योजकांच्या संघटनेची संकल्पना प्रथम मांडण्यात आली होती, त्यावेळीच त्यांच्या कामातील ऊर्जा आणि दृष्टी पाहून हा उपक्रम मोठा होईल, असा विश्वास वाटला.

आता प्रत्येक वर्षी अधिकाधिक संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक कंपन्या महाराष्ट्राशी जोडल्या जात आहेत. सलग तीन वर्षे महाराष्ट्र हा गुंतवणूक आणि स्टार्टअप संख्येनुसार देशातील अग्रगण्य राज्य ठरले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

देशभरातून आणि विदेशातून मुंबई टेक वीकमध्ये सहभागी झालेल्या स्टार्टअप्स आणि तंत्रज्ञान कंपन्यांना उद्देशून मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीचे आवाहन केले आणि ते म्हणाले तंत्रज्ञान आणि एआय क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी हा सर्वोत्तम काळ आहे आणि महाराष्ट्र ही सर्वोत्तम कार्यभूमी आहे. येथे आधीच सक्षम परिसंस्था तयार झाली आहे. महाराष्ट्रासाठी काम करा, भारतासाठी काम करा आणि जगासाठी नवकल्पना घडवा.

राज्य शासन केवळ इनक्युबेशन आणि ॲक्सेलरेशनपुरते मर्यादित नसून 'फंड ऑफ फंड्स'च्या माध्यमातून गुंतवणूक सहाय्यही देत आहे. शासन भागीदार म्हणून तुमच्यासोबत उभे राहण्यास तयार आहे, असे आश्वासनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये एआयच्या वाढत्या वापराची उदाहरणे देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'महा-विस्तार' या शेतकरी ॲपचा विशेष उल्लेख केला. हे शेतकऱ्यांसाठी एक 'वन स्टॉप सोल्युशन' आहे. भारत एआय परिषदेत केंद्र सरकारने त्याला देशातील सर्वोत्तम शेतकरी उपाय म्हणून गौरविले आहे. आता 'इंडिया-विस्तार' संकल्पना त्याच धर्तीवर विकसित होत आहे. तसेच बांधकाम परवानगी प्रक्रियेत एआय आधारित प्रणालीमुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढणार असल्याचे त्यांनी सांगितले.

गुन्हे तपास आणि न्यायप्रक्रियेसाठी तयार करण्यात आलेल्या 'क्राईम ओएस' प्लॅटफॉर्मचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या प्रणालीमुळे तपास, चार्जशीट तयार करणे आणि न्यायालयीन प्रक्रिया अत्यंत वेगवान होणार आहे. पूर्वी १५ हजार पानांच्या आरोपपत्रासाठी तीन-चार महिने लागत; आता एआयमुळे ते दहा-बारा दिवसांत शक्य होणार आहे.

वैद्यकीय विमा योजनांतील गैरव्यवहार शोधणे, एचआर स्टॅकद्वारे शासकीय मनुष्यबळ व्यवस्थापन सुधारणे, वाहतूक नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन आणि निगराणी व्यवस्था यांसारख्या क्षेत्रांतही एआयचा प्रभावी वापर सुरू आहे. राज्य सरकारने विविध विभागांसाठी ५० एआय इंजिन विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवले असल्याची माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

एआयच्या वेगवान विस्तारासोबत निर्माण होणाऱ्या 'डीपफेक', डेटा सुरक्षा आणि विश्वासार्हतेच्या प्रश्नांवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, एथिकल एआय हीच राज्याच्या धोरणाची मध्यवर्ती संकल्पना आहे. एआय सर्वांसाठी उपलब्ध असला पाहिजे. तो केवळ मोठ्या कंपन्यांचा विशेषाधिकार राहता कामा नये. एमएसएमईंनाही त्याचा लाभ मिळायला हवा, तसेच एआयमध्ये मानवी हस्तक्षेप आणि मानवी मूल्ये केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे. असेही प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

# कल्याणमध्ये वाढदिवसाच्या कारणावरून राडा; तरुणाच्या डोक्यात पत्रे मारून गंभीर जखमी

**मुंबई । प्रतिनिधी**

लोक कशाचा राग कशावर काढतील याचा काही नेम नसतो. आपण एखाद्याशी बोलत नाही, म्हणून इतरांनीही त्याच्याशी बोलू नये किंवा संबंध ठेवू नये असं काही लोकांना वाटत असतं. त्यांच्या मनात एखाद्या बद्दलचा पराकोटीचा द्वेष निर्माण झाल्यावर अशा प्रकारची भावना निर्माण होते. पण प्रत्येकजण स्वतंत्र आहे, प्रत्येक व्यक्तीचं एक जग आहे. तो त्याच्या मनाप्रमाणे किंवा मर्जीप्रमाणे वागू शकतो, हे या लोकांच्या गावीच नसतं. ते इतरांवर अधिकार गाजवायला जातात आणि त्यातूनच वादाला फोडणी बसते. कल्याणमध्ये असाच काहीसा प्रकार घडलाय. माझ्या दुश्मनाच्या बर्थडेला का गेला म्हणत दोन चार जणाने एका मित्राला भयानक मारहाण केली. त्यात हा व्यक्ती जखमी झाला आहे.

कल्याणच्या मोहने येथील लहुजी नगर परिसरात ही धक्कादायक घटना घडली. क्षुल्लक कारणावरून तरुणांमध्ये तुफान राडा झाला. या घटनेचा व्हिडीओ सोशल माध्यमांवर व्हायरल होत असून असं कोणी वागतं का? इतकं कोणी मारतं का? अशा प्रतिक्रिया सोशल मीडियातून व्यक्त होत आहेत. तसेच मारहाण करणाऱ्यांना अद्दल घडवण्याची मागणीही होत आहे.



मोन्या फुलारी या तरुणाला भावड्या, बाब्या आणि त्यांच्या अन्य साथीदारांनी भररस्त्यात बेदम मारहाण केली. तू आमच्या दुश्मनाच्या वाढदिवसाला का गेला? असा जाब विचारत आरोपींनी मोन्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. इतकेच नाही तर मारहाणी दरम्यान या तिघाचौघांनी मोन्याच्या डोक्यावर पत्रे मारून त्याला गंभीर दुखापत केली.

या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ परिसरातील एका मुलीने मोबाईलमध्ये शूट केला असून तो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. विशेष म्हणजे मोहने पोलीस चौकीच्या हाकेच्या अंतरावर हा राडा झाला असून खडकपाडा पोलीस ठाण्यात या प्रकरणी तीन ते चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेऊन या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

रात्रीची ही घटना असल्याचं व्हिडीओमध्ये दिसतं. तीनचार जण एका तरुणाला बेदम मारहाण करताना दिसत आहेत. या तरुणाला भररस्त्यात जमिनीवर पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली जात आहे. तर जीव वाचवण्यासाठी हा तरुण ढोरासारखा ओरडत आहे. ढसाढसा रडतानाही दिसत आहे. धायमोकलून रडणाऱ्या आणि किंचाळणाऱ्या या तरुणाला वाचवण्यासाठी कुणीही पुढे येताना दिसत नाही. त्यानंतर या तरुणांनी मोन्याच्या डोक्यात पत्रे मारल्याचंही दिसून येत आहे. व्हिडीओतील मोन्याचा आकांत जीवघेणा असून हा व्हिडीओ पाहिल्यावर काळजाचा थरकाप उडाल्याशिवाय राहत नाही.

# मुलगी पसंत नाही म्हणत ऐनवेळी लग्नास नकार; कुटुंबाचा १४ लाखांचा खर्च वाया

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील बीड तालुका हा कायमच कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत राहिला आहे. आता या तालुक्यातून अतिशय धक्कादायक माहिती समोर आली आहे. लग्नाला अवघे काही दिवस शिल्लक असताना नवरदेवाने लग्नाला नकार दिला. त्याने थेट 'तुमची मुलगी मला शोभत नाही' असे म्हणत लग्नाला नकार दिला आहे. तर मुलीच्या कुटुंबीयांना पिस्तुलचा धाक दाखवून धमकावल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणी मुलीच्या कुटुंबीयांनी पोलिसांत धाव घेतली आहे.

बीडमध्ये कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक पवन निंबाळकर यांचा विवाह ठरला होता. लग्नाची जोरदार तयारी सुरू होती आणि विवाहाला अवघे ११ दिवस शिल्लक होते. मात्र, ऐनवेळी पीएसआय निंबाळकर यांनी 'मुलगी मला शोभत नाही' असे कारण पुढे करत लग्नास नकार दिला. मुलीच्या कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याने यावेळी सरकारी पिस्तुलचा धाक दाखवत त्यांना धमकावले. या प्रकारामुळे मुलीच्या कुटुंबाला मोठा मानसिक आणि आर्थिक धक्का बसला आहे.



या घटनेबाबत बोलताना मुलीचे वडील ज्ञानेश्वर जरांगे यांनी आपली व्यथा मांडली. त्यांनी सांगितले की, मुलीच्या साखरपुड्यालाच आमचे ५ लाख रुपये खर्च झाले होते. लग्नाची तारीख जवळ आल्यामुळे आम्ही मुलीला देण्यासाठी भांडी, फर्निचर आणि इतर सर्व सामानाची खरेदी केली होती. साखरपुडा आणि खरेदी असा एकूण मिळून आमचा १४ ते साडेचौदा लाखांपर्यंतचा खर्च झाला आहे. लग्नाला केवळ ११ दिवस राहिले असताना त्याने अचानक नकार दिल्याने आमचे मोठे नुकसान झाले आहे.

या धक्कादायक प्रकारानंतर मुलीच्या कुटुंबीयांनी न्यायासाठी चकलांबा पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यांच्या तक्रारीवरून पोलीस उपनिरीक्षक पवन निंबाळकर यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दुसरीकडे, पोलीस उपनिरीक्षकाच्या बाजूने देखील एक तक्रार दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. आमच्या मुलीला न्याय मिळावा आणि लग्नाच्या तयारीसाठी आमचा जो काही खर्च झाला आहे, तो आम्हाला परत मिळावा, अशी मागणी मुलीचे वडील ज्ञानेश्वर जरांगे यांनी केली आहे. एका पोलीस अधिकाऱ्यानेच अशा प्रकारचा कारनामा केल्याने बीड जिल्ह्यात खळबळ उडाली असून, पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# मी सर्वसामान्य नाही, रील स्टार आहे!'; टोलनाक्यावर महेश मोटेंचा गोंधळ

**जेजुरी । प्रतिनिधी**

रील स्टारची गाडी अडवण्याची हिमत कशी झाली मी रील स्टार आहे माझी गाडी कशी टोल नाक्यावर अडवली? मी सर्वसामान्य नागरिक नाही.. माझी गाडी अडवलीच कशी असा सवाल करत टोल नाक्यावर एका रील स्टारने धुमाकूळ घातला. त्याने टोल नाक्यावर गाडी उभी करून गोंधळ घालण्यास सुरूवात केल्याने लोकांना मनस्ताप सहन करावा लागला.

रिल स्टारचा उद्दामपणा बघायला मिळाला. पुणे- पंढरपूर महामार्गावर एका टोल नाक्यावर रील स्टारने रात्री मोठा गोंधळ घातला. मी सर्वसामान्य नागरिक नसून रील स्टार आहे. माझी गाडी थांबवलीच कशी असा जबाव विचारताना रील स्टार दिसला. हेच नाही तर यानंतर माझी गाडी थांबवायची नाही, असा दमही त्याने दिला. हा रील स्टार दुसरा तिसरा कोणीही नसून महेश मोटे आहे. महेश मोटेने रील स्टार असल्याची दादागिरी टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांवर केली.

या संपूर्ण राड्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तूफान व्हायरल होत आहे. या रील स्टार करिता कायदा नाही का? असाही प्रश्न अनेकांनी उपस्थित केला. महेश मोटे यांनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये तो स्वत:वारंवार मी रील स्टार आहे सर्वसामान्य नागरिक नाही.. असे वारंवार सांगत आहे. टोल कर्मचाऱ्यासोबत जोरदार हुज्जत घालताना रील स्टार दिसत आहे.



यादरम्यान महेश मोटे चांगलाच रागात दिसला. महेश मोटे याने म्हटले की, मी रील स्टार आहे.. माझी गाडी सोडली नाही तर उद्यापासून रील बनवणार नाही. टोल नाक्यावरील कर्मचाऱ्याला म्हटले की, काय मिळाल्या का सूचना? यादरम्यान रील स्टार याला बोलण्याकरिता एक व्यक्ती पुढे आला. त्याला बोलताना रील स्टारने म्हटले की, तुमचं काय.. तुमचे वय काय? मी तुम्हाला बोललो आहे? तुमचा काय संबंध बोलायचा. तुम्ही बोलायचे नाही. पुढे त्याने म्हटले की, सध्या मी आहे जेजुरीच्या टोल नाक्यावरती. यावेळी टोलनाक्यावर फोनवर बोलणाऱ्या कर्मचाऱ्याला तुमचे नाव काय हे विचारताना तो दिसतोय. यावेळी कर्मचारी बोलताना तो म्हणाला की, मी तुम्हाला काय म्हणालो मी सामान्य माणूस नाही मी सामान्य माणूस नाही काय मित्रांनो एखादा रील स्टारला ८ वर्ष झाले या महाराष्ट्रात घासतोय.. किती लोकांचे प्रॉब्लेम सोडवली किती लोकांना मदत केली.

पण मित्रांनो जर आज माझी गाडी सुटत नसेल तर ठीक आहे काही अडचण नाही. यावेळी महेश मोटे इतर लोकांना सांगताना दिसत आहे की, अरे मित्रा सांग रे त्याला महेश मोटे याची ही गाडी आहे महेश मोटे याची महेश मोटेला अडवत आहे यार.. महेश मोटेला हा व्यक्ती अडवत आहे दादा वरून भांडणे करत आहे माझी गाडी आहे ही.. आता हाच व्हिडीओ तूफान व्हायरल होत आहे.

# अधिकाऱ्यांनी लोकमान्यता मिळेल असे प्रशासकीय कार्य करावे - मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**



भारतीय प्रशासकीय सेवा ही देशाच्या विकासाचा मजबूत आधारस्तंभ आहे. प्रशिक्षण केंद्रे विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेची तयारी करून देत नाहीत, तर त्यांच्यात नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकीची भावना रुजवत असतात. अशा संस्थांची व्याप्ती वाढविण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असून, पुणे येथे प्रशिक्षण संस्था सुरू करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

राज्य प्रशासकीय व्यावसायिक शिक्षण संस्था, मुंबई यांनी आयोजित केलेल्या संघ लोक सेवा आयोग (यूपीएससी)च्या यशस्वी उमेदवारांच्या सत्कार समारंभात मंत्री पाटील बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक शैलेंद्र देवळाणकर, राज्य प्रशासकीय व्यावसायिक शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. भावना पाटोळे आणि सहसंचालक रुपेश राऊत उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, यूपीएससी ही केवळ नोकरी मिळवण्याची परीक्षा नाही, तर ती राष्ट्रसेवेच्या माध्यमातून समाजात परिवर्तन घडवण्याची मोठी संधी आहे. अधिकाऱ्यांनी काम करत असताना सामाजिक परिवर्तन घडवणारे आणि लोकमान्यता मिळवणारे अधिकारी व्हावे. यासाठी प्रशिक्षण शाखांची व्याप्ती वाढवणे आणि दिल्ली येथील प्रशिक्षणार्थ्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सकारात्मक विचार करत आहे.

संचालक शैलेंद्र देवळाणकर म्हणाले, राष्ट्रीय प्रशासन व्यवस्थेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे विशेष प्रयत्न सुरू आहेत. ५० वर्षांपूर्वी प्रशासकीय सेवेमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी होते. ही बाब लक्षात घेऊन १९७६ मध्ये राज्य शासनाने राज्य प्रशासकीय व्यावसायिक शिक्षण संस्थेची (एसआयएसी) स्थापना केली. मुंबईतील शाखेनंतर या संस्थेची व्याप्ती वाढवण्यात आली आणि १९८४ मध्ये नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर येथे केंद्रे सुरू करण्यात आली. पुढे २०१३ मध्ये नाशिक आणि अमरावती येथेही केंद्रे स्थापन करण्यात आली. एसआयएसी ही केवळ संस्था नसून महाराष्ट्राच्या प्रशासकीय आकांक्षांचे प्रतीक आहे. ती प्रत्येक विद्यार्थ्याला देशसेवेसाठी तयार करते.



## थोडक्यात

### पेसा क्षेत्रातील कृषी सेवक पदभरती प्रक्रिया गतीने पूर्ण करा - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील पेसा क्षेत्रातील कृषी विभागातील रिक्त पदे तातडीने भरून कृषी सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक कार्यवाही वेगाने पूर्ण करावी, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. मंत्रालयात पेसा अंतर्गत कृषी सेवक पदभरती, रिक्त जागा भरणे आणि मानधन तत्त्वावरील कृषी सेवकांच्या नियमितीकरणासंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार राजू तोडसाम, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे तसेच सर्व विभागीय कृषी संचालक ऑनलाइन माध्यमातून उपस्थित होते.

कृषिमंत्री भरणे म्हणाले की, राज्यातील १३ पेसायुक्त जिल्ह्यांमधील कृषी सहाय्यक व कृषी सेवक संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी बिंदूनामावलीची प्रक्रिया निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यात यावी. शासनाच्या ११ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या निर्णयानुसार पदभरतीची कार्यवाही तातडीने सुरू करावी. तसेच मानधन तत्त्वावर कार्यरत कृषी सेवकांना कायमस्वरूपी नियुक्ती देण्यासाठी आवश्यक प्रस्ताव आणि प्रशासकीय प्रक्रिया गतीने पूर्ण कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. मागासवर्गीय कक्ष, समाजकल्याण विभाग आणि सर्व विभागीय आयुक्तांनी पेसा अंतर्गत बिंदूनामावलीची तपासणी तातडीने पूर्ण करावी, असे निर्देशही त्यांनी दिले. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करत पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रिया कोणत्याही विलंबाशिवाय पूर्ण करण्यावर शासनाचा भर असल्याचे कृषिमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

आमदार नारायण तोडसाम यांनी पेसा अंतर्गत कृषी सेवक पदभरती, रिक्त जागा भरणे आणि मानधन तत्त्वावरील कृषी सेवकांच्या नियमितीकरणासंदर्भात शासनाकडून गतीने कार्यवाही होणे गरजेचे असल्याचे बैठकीत सांगितले.

### विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी एनसीसी महत्त्वाचे - मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासोबतच देशहिताची भावना निर्माण करणारी प्रभावी चळवळ असून राज्यातील एनसीसी प्रशिक्षणासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील एनसीसी स्वयंसेवक, एनसीसी कॅडेट्स आणि प्रशिक्षण केंद्रांशी संबंधित विविध सुविधा, प्रशिक्षण व्यवस्था आणि नियोजन याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, एनएसएस विभागाचे संचालक मिलिंद काळे, एनसीसी संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी, एनसीसी ग्रुपचे ग्रुप कॅप्टन के. डी. दीपक, कमांडर पी. सुदान, महाराष्ट्र नौदलचे मेजर ईशान कृष्णा तसेच एनसीसी गर्ल्स बटालियनचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, एनसीसी ही केवळ शैक्षणिक उपक्रमांची योजना नसून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण, शिस्त, राष्ट्रसेवा आणि संघटन कौशल्य विकसित करणारे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. विद्यार्थ्यांचा प्रशिक्षणामध्ये अधिकाधिक सहभाग वाढण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक असून प्रशिक्षणाचे नियोजन अधिक प्रभावी आणि कालबद्ध पद्धतीने करण्यात यावे. मुंबई आणि नागपूरसारख्या महानगरांमध्ये जागेच्या अडचणी असल्याचे निदर्शनास आले असून त्या तातडीने दूर करण्यासाठी क्रीडा व युवक कल्याण विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची संयुक्त बैठक घेऊन एनसीसी प्रशिक्षणासाठी स्वतंत्र व सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासनही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले. राज्यामध्ये एनसीसीसाठी प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी जागेची उपलब्धता कशाप्रकारे करता येईल तसेच प्रशिक्षण केंद्रांना आवश्यक सोयी-सुविधा कशा पुरवता येतील, याबाबत एनसीसी अधिकाऱ्यांसोबत सविस्तर विचारविनिमय करण्यात आला.

# व्हॉट्सॲप कॉलवर विश्वास पडला महागात; न्यायाधीशांच्या पत्नीची लाखोंची फसवणूक

**मुंबई । प्रतिनिधी**

ऑनलाइन फसवणुकीच्या आणि सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस प्रचंड वाढ होत असताना, आता फसवणूक करणाऱ्या सायबर चोरांचं जाळं किती व्यापक आणि धाडसी झालं आहे, याचं आणखी एक अत्यंत धक्कादायक उदाहरण वसईत समोर आलं आहे. डिजिटल युगात सर्वसामान्य नागरिकच नव्हे, तर आता उच्चशिक्षित आणि व्हीआयपी लोकही सायबर गुन्हेगारांचे बळी ठरत आहेत. यावेळी फसवणूक करणाऱ्यांनी थेट सत्र न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या पत्नीला आपल्या जाळ्यात ओढून तब्बल १ लाख ८२ हजार ५४४ रुपयांचा मोठा गंडा घातला आहे.

वसईतील सत्र न्यायालयातील न्यायाधीशांच्या पत्नी या स्वतः सुशिक्षित असून त्या बांधकाम व्यवसायाशी संबंधित आहेत. १५ मे रोजी त्यांना एका अनोळखी आंतरराष्ट्रीय किंवा संशयास्पद क्रमांकावरून व्हॉट्सॲप व्हॉईस कॉल आला होता. फोनवरील समोरील अज्ञात व्यक्तीने अतिशय व्यावसायिक भाषेत संवाद साधला. त्याने स्वतःला एक नामांकित अधिकृत प्रतिनिधी असल्याचं भासवत 'गुगल पे' संदर्भात काही तांत्रिक प्रक्रिया आणि डिजिटल अपडेट्स करण्याची अत्यंत निकड असल्याचं सांगितलं.

तक्रारदार महिलेचा पूर्ण विश्वास संपादन केल्यानंतर, सायबर चोरट्याने त्यांना गुगल पे किंवा संबंधित बँक प उघडून तिथे एक विशिष्ट कोड म्हणजेच इंटर अमाऊंट ऑफिसर कोड टाकण्यास सांगितले. न्यायाधीशांच्या पत्नीने समोरच्या व्यक्तीच्या सांगण्यानुसार जशी ही प्रक्रिया सुरू केली, तसाच त्यांचा मोबाईल फोन काही सेकंदांसाठी पूर्णपणे हँग झाला. फोन हँग झाल्याचा गैरफायदा घेत सायबर भामट्यांनी त्यांना बोलण्यात गुंतवून एक छुपा ओटीपी विचारून घेतला आणि त्यांच्या बँक खात्यांमधून पैसे ट्रान्सफर करण्यास सुरुवात केली.

या अतिशय नियोजनबद्ध सायबर फसवणुकीच्या प्रकारात चोरांनी तक्रारदार महिलेच्या दोन वेगवेगळ्या



बँक खात्यांना लक्ष्य केलं. सायबर गुन्हेगारांनी त्यांच्या स्टेट बँक ऑफ इंडिया खात्यातून ९९ हजार ७९४ रुपये आणि एचडीएफसी बँक खात्यातून ८२ हजार ७५० रुपये, अशी एकूण १ लाख ८२ हजार ५४४ रुपयांची रक्कम काही मिनिटांतच लंपास केली. मोबाईलवर बँक खात्यातून पैसे कपात झाल्याचे मेसेज आल्यानंतर आपल्याला सायबर चोरांनी फसवल्याचं या सुशिक्षित महिलेच्या लक्षात आलं.

विशेष म्हणजे, अत्यंत सुशिक्षित, कायदेतज्ज्ञ कुटुंबातील आणि रोजच्या आर्थिक व्यवहारांची उत्तम जाण असलेल्या व्यक्तीलाही सायबर गुन्हेगारांनी आपल्या जाळ्यात अडकवल्याने पोलीस यंत्रणाही चक्रावून गेली आहे. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून वसईतील माणिकपूर पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये (खढ -लीं) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर सेलच्या मदतीने आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक दुर्गा चौधरी यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पोलीस पथक या प्रकरणाचा पुढील तांत्रिक तपास करत आहे. सामान्य नागरिकांनी कोणत्याही अनोळखी कॉल, अज्ञात लिंक, 'ऑफिसर कोड' किंवा ओटीपी संदर्भातील कोणत्याही सूचनेवर चुकूनही विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने अभिवादन



**पिंपरी । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंती महानगरपालिकेच्या वतीने साजरी करण्यात आली.

महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत झालेल्या या कार्यक्रमात उपमहापौर शर्मिला बाबर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उप आयुक्त अण्णा बोदडे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते यशवंत कण्हेरे, विविध विभागातील कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

## पैशांच्या वादातून अल्पवयीनाची कुऱ्हाडीने हत्या

**गडचिरोली । प्रतिनिधी**

पैशांच्या वादातून अल्पवयीन मुलाची निर्घृण हत्या झाल्याने गडचिरोलीत एकच खळबळ उडाली आहे. बादल कोसनकर असे मृतकाचे नाव असून जिल्हा मुख्यालयालगतच्या गुरवळा नदी परिसरात बादलचा रक्ताने माखलेला मृतदेह आढळून आला. पैशांच्या वादातून ही हत्या झाल्याची प्राथमिक माहिती आहे. डोंगरगाव येथील बादल कोसनकर या अल्पवयीन मुलाला जंगल परिसरात गाठून मित्रानेच आरोपींनी कुऱ्हाडीने डोक्यावर आणि मानेवर सपासप वार केले. त्यात त्याचा मृत्यू झाला. गुरुवारी सकाळी गुरवळा नदी परिसरात मृतदेह आढळल्यानंतर स्थानिकांनी पोलिसांना माहिती दिली.

दरम्यान, या प्रकरणी गडचिरोली अल्पवयीन आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे गुरवळा गावात तणावाचं




वातावरण निर्माण झालं आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहे. मात्र अल्पवयीन मुलांमधील किरकोळ वाद रक्तरंजित वादापर्यंत जाऊन हत्येची घटना घडल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

गडचिरोली तालुक्यातील गुरवळा, हिरापूर, विहिरगाव, चांदाळा परिसरात विमानतळ प्रस्तावित आहे. या विमानतळासाठी भूमी अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र गावकऱ्यांना विश्वासात न घेता जमीन सर्वेक्षणाचे काम सुरू करण्यात आले असून परिसरातील जमीन खरेदी विक्रीवर बंदी घालत भूमी अधिग्रहणाचा जीआरही काढण्यात आला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या चार गावातील नागरिकांनी चक्क जनगणनेवरच बहिष्कार घातला आहे. भूमी अधिग्रहणाचा जीआर जोपर्यंत रद्द करणार नाही, तोपर्यंत आमच्या गावात जनगणना होऊ देणार नाही, असा पवित्रा गावकऱ्यांनी घेतला आहे. त्यामुळे प्रशासनाची धावपळ सुरू झाली असून सर्वप्रथम तहसीलदार, संवर्ग विकास अधिकारी, विस्तार अधिकारी यांनी गाव पुढाऱ्यांची भेट घेऊन गावकऱ्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र गावकरी बहिष्कारावर ठाम आहेत. आमची जमीनच राहणार नाही, तर आमची जनगणना कशाला, असा सवाल गावकऱ्यांनी सरकारला केला आहे.

## महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड च्या घरगुती पाईपलाईन जोडणी कामकाज करिता प्लंबर्सची मोठ्या प्रमाणात आवश्यकता

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (एम एन जी एल) कंपनीच्या वरिष्ठ अधिका-यांची आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या समवेत घरगुती पाईपलाईन जोडणी कामकाज संदर्भात नुकतीच बैठक घेण्यात झाली त्या बैठकीत कंपनीने कुशल मनुष्यबळ प्लंबर्सची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असून याबाबत महापालिकेने सहकार्य करण्याबाबत विनंती केली होती.

त्यानुसार अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली, महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था,मोरवाडी येथे उपरोक्त विषयांकित प्रकरणी एमएनजीएल यांच्या सहकार्यातून मार्गदर्शनपर कार्यक्रम व भरती मेळावा घेण्यात आला.यात संस्थेमधील प्लंबर या ट्रेडचे आजी व माजी विद्यार्थ्यांशी समक्ष संपर्क साधून त्यांना निमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य तथा विभागप्रमुख शशिकांत पाटील यांनी विषयास अनुसरून माहिती दिली व भविष्यातील करिअरच्या दृष्टीने सदरचे कामकाज महत्त्वाचे असलेबाबत



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

एमएनजीएल चे वरिष्ठ व्यवस्थापक वासुदेव गुरसाळी यांनी विद्यार्थ्यांना कामकाजाबाबत सविस्तर माहिती दिली तसेच प्लंबर्स इच्छुक असतील तर एम. एन. जी. एल. कडून त्यांना २ दिवसांचे प्रशिक्षण दिले जाईल, प्रशिक्षणानंतर त्यांना अनुभवी प्लंबर्सच्या मार्गदर्शनाखाली साईटवर प्रत्यक्ष काम शिकवले जाईल तसेच भविष्यात सी जी डी कंपन्यांमध्ये कुशल प्लंबर्सची मागणी झपाट्याने वाढणार आहे, त्यामुळे या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

निवडलेले प्लंबर्स हे एम.एन. जी.एल.अधिकृत व्हेंडर्स अंतर्गत काम करतील. त्यांच्या कामाच्या कार्यक्षेत्रामध्ये एम.सी.व्ही.टू.इंस्टॉलेशन, मीटर इंस्टॉलेशन, कॉपर पाईपिंग आणि किचन कन्वर्जनचे काम समाविष्ट आहे. मेहनत आणि प्रामाणिकपणाने काम केल्यास भविष्यात तुम्ही स्वतःचे उद्योजक देखील बनू शकता असे नमूद केले तसेच जॉब वर्कनुसार महिन्याला साधारण ७० हजार पेक्षा जास्त कमाई देखील करू शकतात असेही कळविले.

संस्थेतील साधारण ४० ते ५० प्लंबर विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात करिअर करण्याची उत्सुकता दर्शविली असून संख्या अजून वाढणार आहे, त्यांनी सदर कार्यक्रम व भरती मेळावास निमंत्रित केल्याबद्दल संस्थेचे आभार मानले तसेच अजून प्लंबर्स इच्छुक असतील तर त्यांनी संस्थेस संपर्क साधावा असेही आवाहन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. एम.एन.जी.एल.यांच्यामार्फत उपप्रबंधक ओम उगले व उपप्रबंधक अमोल वैद्य यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमाकरिता गटनिदेशक शर्मिला काराबळे, गटनिदेशक रवी ओव्हाळ, निदेशक किसन गावडे, निदेशक विक्रम काळोखे व निदेशक विशाल रेंगडे यांनी नियोजन केले होते.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ४० उमेदवारांवर अपात्रतेची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे विभागातील नगरपरिषद, नगरपंचायती व महानगरपालिका निवडणुकांमधील पुणे महानगरपालिकेच्या २२, पंढरपूर नगरपरिषदेच्या १५ व अक्कलकोट नगरपरिषदेच्या ३ अशा एकूण ४० उमेदवारांवर २६ मे २०२६ पासून पुढील ३ वर्षासाठी अपात्र केल्याचे आदेश विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी जारी केले आहेत. अपात्र घोषित करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पुणे विभागातील एकूण ६० नगरपरिषदा, नगरपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर २०२५ व ६ महानगरपालिकांची सार्वत्रिक निवडणूक १४ जानेवारी २०२६ रोजी पार पडली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये निवडणूक लढविलेल्या पुणे महानगरपालिकेच्या २२, पंढरपूर नगरपरिषदेच्या १५ व अक्कलकोट नगरपरिषदेच्या ३ उमेदवारांनी अनुक्रमे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १० (१ई) तसेच महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ कलम १६ (१ड) मधील तरतुदीनुसार




विहित मुदतीत (३० दिवस) निवडणूक खर्चाचा हिशोब सादर केला नाही.

पुणे महानगरपालिका आयुक्त तसेच सोलापूर जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे ५ व २५ मे २०२६ रोजी याबाबत संबंधिताना आपले म्हणणे दाखल करण्याबद्दल सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीदरम्यान संबंधित उमेदवारांकडून समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्याने राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार संबंधित उमेदवारांना निवडणूक खर्च सादर करण्यात कसूर केल्याबद्दल आदेशाच्या दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीसाठी निवडणूक लढविण्यास अपात्र घोषित करण्यात आले असल्याची माहिती नगर परिषद प्रशासनाच्या उप आयुक्त प्रतिभा पाटील यांनी कळविली आहे.

## गांजा तस्कराला पकडायला आलेल्या पोलिसांवर जीवघेणा हल्ला

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील चिकलठाणा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पळशी गावात कायदा आणि सुव्यवस्थेच्या चिंधड्या उडवणारी एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथून एका कुख्यात गांजा तस्कराला अटक वॉरंट बजावण्यासाठी आलेल्या पोलीस पथकावर स्थानिक तस्कराने तब्बल ३० जणांचा हिंसक जमाव जमवून जीवघेणा हल्ला चढवला. या तुफान दगडफेक आणि लाठीहल्ल्यात विशाखापट्टणमच्या पोलीस निरीक्षकांसह संपूर्ण पोलीस पथक गंभीर जखमी झाले आहे.

हल्लेखोरांनी पोलिसांना बेदम झोडपून त्या कुख्यात गांजा तस्कराला पोलिसांच्या ताब्यातून पळवून लावले. इतकेच नव्हे, तर या गोंधळाचा फायदा घेत हल्लेखोरांनी एका पोलीस अधिकाऱ्याची सोन्याची साखळी देखील लुटल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. पोलिसांवर हल्ला करून फरार झालेल्या मुख्य गांजा तस्कराचे नाव गणेश मुरलीधर पवार (रा. पळशी) असे आहे. तर पोलिसांवर हल्ला करून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी संतोष भाऊसाहेब पळसकर, रावसाहेब विनायक पळसकर आणि शिवाजी रावसाहेब पळसकर (सर्व राहणार पळशी, छ. संभाजीनगर) या आरोपींची नावे समोर आली आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, विशाखापट्टणम येथे नोंद असलेल्या एका मोठ्या गांजा



तस्करीच्या गुन्ह्यात गणेश मुरलीधर पवार हा मुख्य संशयित आरोपी आहे. त्याला अटक करण्यासाठी विशाखापट्टणम पोलिसांचे एक विशेष पथक अटक वॉरंट घेऊन चिकलठाणा पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येणाऱ्या पळशी गावात दाखल झाले होते. पोलिसांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत गणेश पवार याला ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, कारवाई सुरू असतानाच गावातून तब्बल ३० जणांचा जमाव गोळा झाला. या जमावाने विशाखापट्टणम पोलिसांवर अचानक लाठ्या-काठ्या आणि दगडांनी तुफान हल्ला चढवला.

जमावाने केलेल्या या अचानक आणि हिंसक दगडफेकीत पोलीस निरीक्षकांसह संपूर्ण पथक गंभीर जखमी झाले आहे.

आरोपीच्या साथीदारांनी त्याला पोलिसांच्या विळख्यातून सोडवून पळवून लावले. तर यावेळी एका पोलीस अधिकाऱ्याच्या गळ्यातील सोन्याची साखळीही ओरबाडण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. जखमी पोलीस अधिकाऱ्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून परराज्यातील पोलीसही आता महाराष्ट्रात सुरक्षित नाही का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## सामाजिक न्याय विभागाच्या विविध शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

**पुणे । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह (नविन), गुणवडी ता. बारामती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह सासवड ता. पुरंदर व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतीगृह तळेगाव दाभाडे येथे प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता ७ वी नंतर शालेय शिक्षण, कनिष्ठ महाविद्यालय, बिगर व्यावसायिक तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय अनुसूचित जातीमधील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना मोफत शासकीय वसतिगृह प्रवेश देण्यात येणार आहे.

वसतिगृह प्रवेश हा प्रवर्गनिहाय आरक्षण व गुणवत्तेनुसार करण्यात येणार आहे. शासकीय वसतिगृहात विद्यार्थ्यांना विनामूल्य निवास, आंथरूण-पांघरूण, भोजन सुविधा, पुस्तके, स्टेशनरी, विविध शैक्षणिक बाबींसाठी आर्थिक सहाय्य तसेच दरमहा निर्वाह भत्ता यासह विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी https://hmas.mahait.org/ या संकेतस्थळावर जाऊन प्रवेशासंबंधित सूचना वाचून ऑनलाईन अर्ज भरावा, असे आवाहन वस्तीगृहाच्या गृहपालाकडून करण्यात आले आहे.

# गतीमान प्रशासनासाठी ई-ऑफिस प्रणालीसह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा - अपर मुख्य सचिव विकास खारगे

**जालना । प्रतिनिधी**

महसूल विभाग हा समाजासाठी काम करणारा महत्त्वाचा घटक असल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी ओळखुन काम करत, गतिमान प्रशासनासाठी ई-ऑफिस प्रणाली आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन महसुल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महसुल विभागाच्या आढावा बैठकीत श्री. खारगे बोलत होते. यावेळी बैठकीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, सुकेशिनी पगारे, सह जिल्हा निबंधक रामेश्वर रोडगे, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख एम. पी. मगर, तहसिलदार छाया पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अपर मुख्य सचिव श्री. खारगे पुढे म्हणाले की, नागरीकांना पारदर्शकपणे सेवा देण्यासाठी तसेच शासकीय कामकाजात गती आणुन कामाकाजातील प्रलंबितता कमी करण्यासाठी सर्व महसुल यंत्रणांनी ई-ऑफिस प्रणालीचा वापर करणे आवश्यक आहे. शासनाने ईज ऑफ डुइंग बिझनेसचे धोरण स्विकारले आहे. तसेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस क्षेत्रीय दौरा करावा. यामुळे नागरिकांचे प्रश्न समजावून घेण्यास मदत होते. तसेच त्यांनी दिलेल्या निवेदनांवर सकारात्मक कारवाई करावी. तसेच विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करुन, गुणवत्ता जाणून घेण्यास मदत होते. प्रशासनाने नागरिकामध्ये जावून काम करण्याचा प्रयत्न करावा. नागरिकांच्या समस्या, तक्रारींचा निपटारा करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करुन त्यांच्या तक्रारींचा पाठपुरावा घ्यावा. कोणताही पाणंद रस्ता घेण्यापूर्वी




तो अतिक्रमणमुक्त असावा, तसेच भूमी अभिलेख कार्यालयाकडून त्याचे सीमांकन करुन घ्यावे. पाणंद रस्त्यांच्या दर्जेदार कामांवर लक्ष ठेवण्याचे आणि पावसाळ्यापूर्वी जास्तीत-जास्त रस्ते पूर्ण करण्याचे नियोजन करावे. तसेच शासकीय जमिनी अतिक्रमण विरहित कशा राहतील तसेच त्यांचे व्यवस्थापन कसे करता येईल याचे नियोजन करावे. शासकीय आणि खाजगी जागेची जबाबदारी महसुल विभागाकडे आहे. याकरीता सर्व सातबारा आणि मिळकत पत्रिका व्यवस्थित सुरक्षित ठेवाव्यात. तसेच नागरिकांना अनावश्यक त्रास होऊ नये, यासाठी सर्व अर्जांची वेळेत व पारदर्शक पद्धतीने पूर्तता करण्याचे आवाहन केले. यावेळी अपर मुख्य सचिव खारगे यांनी त्यांनी जनगणना, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान, शासकीय जमिनी वाटप व शर्तभंग प्रकरणे,पर्यायी वनीकरण,वन जमिनीचे ७/१२ अद्ययावत करणे, सिलिंग जमिन प्रकरणे, शेत व पाणंद रस्ते योजना, ई-पीक पाहणी, फेरफार नोंदी, वनहक्क दावे, अवैध गौण खनिज, घरकुलांना वाळू उपलब्ध करुन देणे आदी विषयांसह महसूल विषयक इतर कामांचाही आढावा घेतला.

निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी सादरीकरणांद्वारे महसुल विभागातील विविध विषयांचा सविस्तर माहिती सादर केली. यावेळी बैठकीस जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, उपअधिक्षक भूमि अभिलेख, सह दूय्यम निबंधक यांची ऑनलाईन उपस्थिती होती.

# विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता

**जालना । प्रतिनिधी**

**जालना । प्रतिनिधी**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा (मुंबई) यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात ३१ मे ते २ जून २०२६ या कालावधीत हवामानात मोठा बदल होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यासाठी ऑरेंज आणि यलो अलर्ट जारी करण्यात आला असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार या कालावधीत जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. काही भागांत ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात. तसेच हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचीही शक्यता वर्तविण्यात आली आहे.

संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नागरिकांना विशेष दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे. मेघगर्जना सुरू असताना किंवा वीज चमकत असताना झाडाखाली अथवा झाडांजवळ थांबू नये. तसेच धोकादायक ठिकाणी सेल्फी काढण्याचे टाळावे. गडगडाटी वादळादरम्यान विद्युत उपकरणांचा वापर करू नये आणि विद्युतवाहक वस्तूंपासून दूर राहावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. वादळी हवामानात ट्रॅक्टर, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल यांच्यापासून सुरक्षित अंतर राखावे. मोकळे मैदान, मोबाईल टॉवर, ध्वजस्तंभ, वीज खांब, धातूचे कुंपण, विद्युतवाहिन्या आणि ट्रान्सफॉर्मरजवळ थांबणे धोकादायक ठरू शकते. तसेच अधांतरी लटकणाऱ्या किंवा तुटलेल्या विद्युत तारांपासून दूर राहण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

वीज चमकत असताना मोकळ्या जागेत अडकल्यास नागरिकांनी गुडघ्यावर बसून हातांनी कान झाकावेत आणि डोके गुडघ्यांमध्ये ठेवावे. अशा स्थितीत जमिनीशी कमीतकमी संपर्क ठेवणे सुरक्षित ठरते, असे तज्ज्ञांनी सांगितले आहे.

# पद्म पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिन दि. २६ जानेवारी, २०२७ रोजी घोषित होणाऱ्या पद्म पुरस्काराकरिता (पद्मश्री, पद्म भूषण, पद्मविभूषण) शिफारशी केंद्र शासनामार्फत नामांकन प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

पद्म पुरस्कार हे सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक असून ते अतिशय प्रतिष्ठेचे आहेत. याबाबतचे अधिनियम आणि नियम केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या www.padmaawards.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्यानुसार जालना जिल्ह्यातील पद्म पुरस्कारासाठी पात्र व इच्छुक मान्यवरांची वैयक्तीकरीत्या ऑनलाईन नामांकन पोर्टलवर दि. ३१ जुलै २०२६ पर्यंत सादर करण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, यांनी आवाहन केले आहे.

## शासकीय मुलींचे वसतिगृह येथे विनामुल्य प्रवेश अर्ज वाटप सुरु

**जालना । प्रतिनिधी**

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात मुलींचे शासकीय वसतिगृह जालना/मंठा व संत भगवानबाबा मुलींचे शासकीय वसतिगृह जालना/मंठा येथे विनामुल्य प्रवेश अर्ज कार्यालयीन वेळेत वसितगृहात उपलब्ध आहेत. इच्छुक विद्यार्थिनींनी प्रवेश स्वीकारण्याचे आवाहन मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह अधिक्षिका प्रियंका लोंढे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. संपर्क क्र. ९८२२६४९७४१

# ऊसतोड कामगारांच्या मुलांना क्रीडा साहित्याचे वाटप; बालकामगार व बालविवाहविरोधी जनजागृती

**जालना । प्रतिनिधी**

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात बालके मैदानी खेळांपासून दूर जात मोबाईलमध्ये अधिक वेळ घालवत असल्याने त्यांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासावर विपरीत परिणाम होत आहे. ही बाब लक्षात घेऊन मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने परतूर तालुक्यातील विविध तांड्यांमध्ये ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात आला. को हादगाव तांडा, वडारवाडी (धामणगाव), संकनपुरी, परतवाडी तांडा, रायगव्हाण, अकोली, वाहेगाव आणि आसनगाव या ठिकाणी बालगट, युवक गट आणि किशोरी गटातील मुलांना थ्रो बॉल, दोरी तसेच विविध क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले. चला मैदानाकडे हा संदेश देत मुलांना मैदानी खेळांचे महत्त्व पटवून देण्यात आले. ऊसतोड कामगार पालक रोजगारासाठी स्थलांतरित होत असल्याने त्यांच्या मुलांवर मानसिक व भावनिक परिणाम होत असतो. अशा मुलांना खेळाच्या माध्यमातून आनंद, आत्मविश्वास आणि भावनिक आधार मिळावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.



कार्यक्रमादरम्यान महिला व पुरुषांच्या बैठकीत बालकामगार विरोधी जनजागृती करण्यात आली. बालकामगार ठेवणे हा कायद्याने गुन्हा असून त्यासाठी शिक्षा व दंडाची तरतूद असल्याची माहिती देण्यात आली. तसेच अल्पवयीन मुलामुलींचे विवाह रोखण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक कायद्याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमात जिल्हा समन्वयक एकनाथ राऊत, गाव स्वयंसेवक महादेव खरात, आकाश चव्हाण, योगेश आढे, राजेश वाघमारे, सुरेखा वाघमारे, दुर्गा नाडे तसेच गावपातळीवरील युवक गट, बाल गट आणि किशोरी गटातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी बालकामगार ठेवणार नाही आणि बालविवाह करणार नाही अशी सामूहिक शपथ घेत सामाजिक बांधिलकी जपण्याचा निर्धार व्यक्त केला.

# कडवंची येथे जिल्हाधिकाऱ्यांचा मुक्कामी दौरा

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दि. २७ मे रोजी जालना तालुक्यातील कडवंची गावात मुक्कामी दौरा करून ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. ग्रामीण भागातील प्रशासनाची कामकाज पद्धती, विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी तसेच गावाच्या विकासाचा प्रत्यक्ष आढावा घेत त्यांनी लोकाभिमुख प्रशासनाचा अनुभव गावकऱ्यांना दिला.

जिल्हाधिकारी या रात्री सुमारे दहा वाजता कडवंची गावात दाखल झाल्या. यावेळी प्रगतशील शेतकरी कृष्णा क्षिरसागर यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांनी गावातील शेतकऱ्यांशी संवाद साधत कडवंची गावाचा द्राक्ष शेतीमुळे झालेला विकास, शेतकऱ्यांची प्रगती आणि यशोगाथा जाणून घेतली. द्राक्ष पिकाच्या माध्यमातून गावाने आर्थिकदृष्ट्या केलेली भरारी ऐकून त्यांनी समाधान व्यक्त केले. पुढील काळात अधिक प्रगती साधण्यासाठी



द्राक्ष पिकावर आधारित प्रक्रिया उद्योग, पूरक व्यवसाय आणि मूल्यवर्धित उपक्रम सुरू करण्याबाबतही त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

पहाटे सहा वाजता उठून जिल्हाधिकारी यांनी ग्रामीण भागातील पहाटेची दिनचर्या अनुभवली. गावातील कृषी सेवा केंद्राला भेट देऊन विविध फवारणी औषधे, खते आणि कृषी साहित्याची माहिती घेतली. शेतकऱ्यांना योग्य दरात व गुणवत्तापूर्ण साहित्य उपलब्ध होते का, याचीही त्यांनी चौकशी केली.

त्यानंतर त्यांनी महा-ई-सेवा केंद्राला भेट देऊन नागरिकांना विविध दाखले व प्रमाणपत्रे वेळेत आणि रास्त दरात मिळतात का, याची माहिती ग्रामस्थांकडून घेतली. स्वस्त धान्य दुकानात जाऊन लाभार्थ्यांना नियमित व पुरेसे धान्य मिळते का, याची खातरजमा सामान्य नागरिकांशी थेट संवाद साधून केली. ग्रामपंचायत कार्यालयाच्या

भेटीदरम्यान त्यांनी ग्रामपंचायतीच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. गावाने उत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. तसेच अंगणवाडी केंद्राला भेट देऊन तेथील शिजवलेल्या अन्नाची प्रत्यक्ष चव घेऊन गुणवत्ता तपासली. खिचडीची गुणवत्ता समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद केले. सध्या गावात सुरू असलेल्या जनगणनेच्या कामाचाही त्यांनी आढावा घेतला. प्रगणकांसोबत घरगणनेच्या प्रक्रियेची तपासणी करून कामकाजाबाबत सूचना दिल्या. यावेळी उपविभागीय अधिकारी श्री. दौंड, तहसीलदार छाया पवार आदींची उपस्थिती होती.

# शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

समाज कल्याण कार्यालयांतर्गत मुलां-मुलींचे शासकीय वसतिगृहासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह जालना, भोकरदन, अंबड, बदनापुर, घनसावंगी, संत रामदास शासकीय वसतिगृह, जालना व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, जालना, अंबड, मंठा, भोकरदन या शासकीय वसतिगृहामध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश देण्यात येत आहेत. याकरीता गरजु व पात्र विद्यार्थ्यांनी आजच https://hmas.mahait.org/ या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच शालेय विद्यार्थ्यांना दि. ३० जुन २०२६ रोजी पर्यंत ऑनलाईन अर्ज करावे. तर इयत्ता ११ वी आणि बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी दि. १५ जुलै २०२७ ही अर्ज करण्याची शेवटची तारीख असेल.

यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागासप्रवर्गसह इतर प्रवर्गाच्या इयत्ता आठवी, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये रिक्त असणाऱ्या जागेवर विनामुल्य प्रवेश ऑनलाईन पध्दतीने गुणवत्तेनुसार देण्यात येणार आहे. जर गुणवत्तेनुसार किंवा जागेअभावी विद्यार्थ्याला शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, तरच त्याला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा अर्ज सादर करता येईल. जे विद्यार्थी वसतिगृह योजनेचा अर्ज भरणार नाहीत त्यांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना व वसतिगृह दोन्ही योजनेचा लाभ मिळणार नाही. ज्या तालुक्यामध्ये शासकीय वसतिगृहे नाहीत अशा तालुक्यात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यासाठी सदर नियम शिथील केला आहे.

शासकीय वसतिगृहात विनामुल्य निवास व भोजनासह शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता, ग्रंथालय, जिम व इंटरनेट वाय-फाय इत्यादी सुविधा विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येतात. तरी गरजु विद्यार्थ्यांनी प्रवेशाबाबतचे अर्ज करण्यासाठी https://hmas.mahait.org/ या संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन अर्ज


# नौतपाचा तडाखा वाढला; नागरिकांनी काळजी घ्या - डॉ.भागवत काळे

## उष्माघात, डिहायड्रेशनचा धोका वाढला; पाणी, विश्रांती आणि योग्य आहार महत्त्वाचा

**जालना । प्रतिनिधी**

राज्यासह जालना जिल्ह्यात सध्या 'नौतपा'चा प्रभाव तीव्र होत असून तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. सकाळपासूनच कडक ऊन आणि दुपारी उष्णतेची लाट नागरिकांना त्रासदायक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघात आणि डिहायड्रेशनसारख्या गंभीर समस्यांचा धोका वाढला असून नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन डॉ.भागवत काळे यांनी केले आहे.

तज्ज्ञ डॉक्टरांच्या मते, 'नौतपा' म्हणजे उन्हाळ्यातील सलग नऊ दिवसांचा अत्यंत उष्ण कालावधी. या काळात सूर्याची किरणे अधिक तीव्र असल्याने तापमान झपाट्याने वाढते. त्यामुळे शरीरातील तापमान नियंत्रणाची क्षमता कमी पडू शकते आणि त्याचा थेट परिणाम आरोग्यावर होतो. डॉ. भागवत काळे यांनी सांगितले की, नेहमीच्या उन्हाळ्यापेक्षा नौतपातील उष्णतेची लाट अधिक धोकादायक असते. शरीराचे तापमान झपाट्याने वाढल्याने डोकेदुखी, अशक्तपणा, चक्कर येणे, मळमळ, उलट्या, डिहायड्रेशन आणि काहीवेळा उष्माघाताचा गंभीर धोका निर्माण होतो.



उष्माघात आणि उष्णतेने येणारा थकवा यातील फरक ओळखणेही महत्त्वाचे आहे. उष्णतेमुळे थकवा आल्यास घाम जास्त येतो, अशक्त वाटते, चक्कर येते; मात्र उष्माघातात शरीराचे तापमान खूप वाढते, घाम कमी होतो किंवा थांबतो, गोंधळल्यासारखे वाटते आणि व्यक्ती बेशुद्धही पडू शकते. अशा वेळी दुर्लक्ष करणे जीवघेणे ठरू शकते.

जर एखाद्या व्यक्तीला उन्हाचा त्रास होऊन चक्कर येऊन ती पडली, तर तिला तातडीने सावलीत किंवा थंड जागी हलवावे. कपडे सैल करावेत, चेहरा आणि शरीरावर थंड पाण्याचे शिंतोडे मारावेत, शुद्धीवर असल्यास पाणी किंवा ओआरएस द्यावे आणि त्वरित डॉक्टरांकडे घेऊन जावे, असा सल्ला डॉक्टरांनी दिला. नौतपाच्या काळात रोजच्या आहारात आणि दिनचर्येतही बदल करणे गरजेचे आहे. भरपूर पाणी, ताक, लिंबूपाणी, पन्हे, नारळपाणी यांचा समावेश करावा. तेलकट, मसालेदार आणि खूप गरम पदार्थ टाळावेत. बाहेर पडताना डोक्यावर टोपी किंवा गमछा ठेवावा. विशेषतः लहान मुले, गरोदर महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी दुपारच्या वेळी बाहेर जाणे टाळावे. मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा हृदयविकार असलेल्या रुग्णांनी औषधे वेळेवर घ्यावीत, शरीरातील पाणी कमी होऊ देऊ नये आणि त्रास जाणवल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

उन्हाळ्यात फिकट रंगाचे आणि सुती कपडे घालण्याचा सल्ला यासाठी दिला जातो की, असे कपडे उष्णता कमी शोषतात आणि शरीराला हवा मिळते. तसेच उन्हातून आल्यावर लगेच अतिथंड पाणी पिणे किंवा एसीमधून थेट उन्हात जाणे टाळावे, कारण त्यामुळे शरीरावर अचानक ताण येऊ शकतो. नौतपाच्या काळात तहान लागेपर्यंत थांबू नका, नियमित पाणी प्या. दुपारचे कडक ऊन शक्यतो टाळा, शरीराची काळजी घ्या आणि कोणतीही लक्षणे दिसताच दुर्लक्ष न करता डॉक्टरांचा सल्ला घ्या, असा महत्त्वाचा सल्ला डॉक्टर भागवत काळे यांनी नागरिकांना दिला आहे. उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत असल्याने पुढील काही दिवस नागरिकांनी सतर्क राहून स्वतःची आणि कुटुंबाची काळजी घेणे अत्यंत आवश्यक ठरणार आहे.

**- डॉ.भागवत काळे (चंदनझीरा,जालना)**

# संक्षिप्त

## तंबाखू विरोधी दिनानिमित्त मंत्रालयात जनजागृती कार्यक्रम

**मुंबई । प्रतिनिधी**

'जागतिक तंबाखू विरोधी दिना'निमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि नशाबंदी मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांना तंबाखूमुक्तीची शपथ दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. कांबळे आणि समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते व्यसनमुक्तीविषयक पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. कांबळे यांनी जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे महत्व अधोरेखित करत तंबाखूच्या व्यसनामुळे होणाऱ्या गंभीर आरोग्यविषयक परिणामांबाबत माहिती दिली.

विशेषतः २० ते ३० वर्षे वयोगटातील तरुणांमध्ये तंबाखू सेवनाचे प्रमाण चिंताजनकरित्या वाढत असल्याचे नमूद करत डॉ. कांबळे यानी युवकांनी तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहून निरोगी जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन केले. तंबाखूमुक्त समाज निर्माण करण्यासाठी जनजागृती आणि सामूहिक सहभाग अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी नशाबंदी मंडळाचे चिटणीस व मुख्य संघटक अमोल स. भा. मडामे यांनी महाराष्ट्र हे २०११ मध्ये व्यसनमुक्ती धोरण जाहीर करणारे देशातील पहिले राज्य असल्याचे सांगितले. व्यसनमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने अधिक प्रभावी पावले उचलण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आणि धार्मिक स्थळांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री बंद करण्यासाठी व्यापक जनजागृती आणि कायद्याच्या अंमलबजावणीसाठी मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमादरम्यान 'कल्याणयात्रा - व्यसनमुक्तीच्या गाथा' या मासिकाच्या मे २०२६ अंकाचे प्रकाशन डॉ. कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच तंबाखूमुक्ती विषयक पोस्टर्सचेही प्रकाशन करण्यात आले.डॉ. कांबळे आणि आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांनी विविध संस्थांच्या स्टॉलना भेट देऊन त्यांच्या कार्याचे कौतुक केले. पोस्टर्स, प्रदर्शने, पत्रके आणि माहितीपर कटआऊटच्या माध्यमातून तंबाखूजन्य पदार्थांचे दुष्परिणाम तसेच 'तंबाखूजन्य पदार्थ विक्री कायदा २००३' संदर्भातील माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली. या कार्यक्रमात नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, सलाम मुंबई फाऊंडेशन, सेंट जॉर्ज हॉस्पिटल, केईएम हॉस्पिटल, प्रजापिता ब्रह्मकुमारीज यांसह अनेक संस्थांनी सहभाग घेत व्यसनमुक्तीचा संदेश दिला. कार्यक्रमास नशाबंदी मंडळाच्या वतीने मुंबई शहर संघटक चेतना सावंत, ठाणे जिल्हा संघटक मिलिंद पाटील तसेच मंडळाचे कर्मचारी उपस्थित होते.

## पाच अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि आधुनिक औद्योगिक परिसंस्था विकसित करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत सुमारे ८९ हजार ७३१ कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पांमुळे राज्यात अंदाजे २० हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असून विदर्भ, मराठवाडा, नाशिकसह राज्यातील विविध भागांमध्ये औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राज्याच्या औद्योगिक धोरणानुसार सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत उद्योगांना विविध सवलती व प्रोत्साहने देण्यात येतात. त्याअंतर्गत नवीन उद्योग स्थापन होऊन मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित व्हावी, रोजगार वाढावा आणि औद्योगिक परिसंस्था निर्माण व्हावी, यासाठी विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष सवलती देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. या उपसमितीची बैठक मंत्रालयात पार पडली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड,
मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - MHMAR/25/A1224

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224